सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ८९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ रविवार दि. २७ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६






सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्षे - ३ रे ❑ अंक - ८९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ रविवार दि. २७ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## मी आश्वासन देतो की, दहशतवाद्यांना कठोर प्रत्युत्तर दिले जाईल

### 'मन की बात'मधून पंतप्रधान नरेंद्र मोदींचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमात पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. ते म्हणाले, आज जेव्हा मी तुमच्याशी बोलत आहे, तेव्हा मला खूप वेदना होत आहेत. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी घटनेने देशातील प्रत्येक नागरिकाला दुःख झाले आहे. प्रत्येक भारतीयाला पीडित कुटुंबाबद्दल सहानुभूती आहे. तो कोणत्याही राज्यातील असो, कोणतीही भाषा बोलणारा असो, या हल्ल्यात ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत त्यांच्या वेदना मला जाणवत आहेत.

यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, दहशतवाद्यांना आणि त्यांच्या सूत्रधारांना काश्मीर पुन्हा उद्ध्वस्त करायचे आहे आणि म्हणूनच त्यांनी एवढा मोठा कट रचला. दहशतवादाविरुद्धच्या या युद्धात देशाची एकता, १४० कोटी भारतीयांची एकता ही आपली सर्वात मोठी ताकद आहे. ही एकता दहशतवादाविरुद्धच्या आपल्या निर्णायक लढाईचा आधार आहे.

पंतप्रधान पुढे म्हणाले, देशासमोरील या आव्हानाला



तोंड देण्यासाठी आपल्याला आपला संकल्प मजबूत करावा लागेल. एक राष्ट्र म्हणून आपल्याला प्रबळ इच्छाशक्ती दाखवावी लागेल. आज जग पाहत आहे, या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देश एकजूट झाला आहे.

#### दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्यांची निराशा

पंतप्रधान मोदी म्हणाले, पहलगाममधील हा हल्ला दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्यांची निराशा आणि त्यांचा भ्याडपणा दर्शवितो. काश्मीरमध्ये शांतता परतत होती, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये चैतन्य होते, विकास कामांना गती मिळाली होती, लोकशाही मजबूत होत होती, पर्यटकांच्या संख्येत विक्रमी वाढ होत होती, लोकांचे उत्पन्न वाढत होते, तरुणांसाठी नवीन संधी निर्माण होत होत्या. हे देशाच्या शत्रूंना, जम्मू-काश्मीरच्या शत्रूंना आवडले नाही.


#### दहशतवादाविरुद्धच्या लढाईत संपूर्ण जग

भारतीय लोकांमध्ये जो राग आहे तो जगभर आहे. या दहशतवादी हल्ल्यानंतर जगभरातून संताप व्यक्त केला जात आहे. जागतिक नेत्यांनीही मला फोन केले आहेत, पत्रे लिहिली आहेत आणि संदेशही पाठवले आहेत. या भयानक दहशतवादी हल्ल्याचा सर्वांनी तीव्र निषेध केला आहे. त्यांनी मृतांच्या कुटुंबियांबद्दल शोक व्यक्त केला आहे. दहशतवादाविरुद्धच्या आपल्या लढाईत संपूर्ण जग १४० कोटी भारतीयांसोबत उभे आहे. मी पुन्हा एकदा पीडित कुटुंबांना आश्वासन देतो की, त्यांना न्याय मिळेल, न्याय नक्कीच मिळेल. या हल्ल्यातील गुन्हेगारांना आणि कट रचणाऱ्यांना कठोर प्रत्युत्तर दिले जाईल, असेही पंतप्रधान मोदी मन की बात कार्यक्रमात बोलताना म्हणाले.

## मुख्यमंत्री फडणवीसांकडून जगदाळे, गणबोटे कुटुंबीयांचे सांत्वन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

पर्यटनासाठी काश्मीरमध्ये गेलेल्या कौस्तुभ गणबोटे आणि संतोष जगदाळे यांचा दहशवाद्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाला. घरातील कर्ता पुरुष गेल्याने या कुटुंबीयांवर मोठे संकट आले आहे.



त्यामुळे या कुटुंबातील सदस्यांना शासकीय नोकरी देता येईल का त्याबाबत प्रयत्न करू, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. गणबोटे यांच्या कोंढवा येथील निवासस्थानी तर जगदाळे यांच्या कर्वेनगर येथील निवासस्थानी काल मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी जगदाळे यांची पत्नी प्रगती, मुलगी आसावरी व मातोश्री माणिकबाई जगदाळे तसेच त्यांचे इतर कुटुंबीयांचे फडणवीस यांनी सांत्वन केले व तेथे घडलेला संपूर्ण घटनाक्रम जाणून घेतला.

यावेळी जगदाळे कुटुंबीयांनी पर्यटन स्थळांवरील सुरक्षा अधिक मजबूत करावी, अशी मागणी मुख्यमंत्र्यांना केली. काश्मीरमध्ये घडलेल्या त्या घटनेचा संपूर्ण वृत्तांत त्यांनी फडणवीस यांना सांगितला. तसेच मुलगी आसावरी हिला शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी त्यांनी केली.

## दिल्लीत राहतात ५,००० पाकिस्तानी नागरिक इंटेलिजेंस ब्युरोने पोलिसांना सोपवली यादी

### केंद्र सरकारच्या भारतातील पाकिस्तानी नागरिकांना परत जाण्याच्या सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नवी दिल्ली**

जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कठोर भूमिका घेतली असून देशात राहाणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना देश सोडून जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर इंटेलिजेंस ब्युरो (खइ) ने राष्ट्रीय राजधानी दिल्लीत राहणार्या सुमारे ५,००० पाकिस्तानी नागरिकांची यादी दिल्ली पोलिसांना सोपवली आहे.

जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना देण्यात आलेले व्हिसा रद्द केले आहेत.परदेशी प्रादेशिक नोंदणी कार्यालयाने (ऋठठज) पाकिस्तानी नागरिकांची ही यादी दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेला सोपवली आहे आणि पुढील पडताळणी आणि ओळख पटविण्यासाठी ती



संबंधित जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना दिली जाणार आहे. या यादीमध्ये ज्यांच्याकडे दीर्घ काळासाठीचा व्हिसा आहे अशा हिंदू पाकिस्तानी नागरिकांची देखील नावे आहेत.

ही यादी संबंधीत जिल्ह्यांना पडताळणीसाठी पाठवली आहे आणि पाकिस्तानी नागरिकांना त्यांच्या मायदेशी परत जाण्यास सांगण्यात आले आहे. मध्य आणि उत्तर पूर्व जिल्ह्यांमध्ये राहत असलेल्या पाकिस्तानी नागरिकांची संख्या जास्त आहे, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

या प्रकरणासंबंधी एक बैठक बोलावण्यात आली असून दिल्ली पोलिसांना या प्रकरणात त्वरित कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असे अधिकाऱ्याने सांगितले. तसेच वरिष्ठ अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत, अशी माहितीही देण्यात आली आहे.

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल ब्रांचला आणि गुप्तचर विभागाला दिल्लीत राहाणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांची माहिती गोळा करण्याचे काम सोपवण्यात आले आहे. तसेच त्यांना लवकरात लवकर भारत सोडण्यास सांगण्याची जबाबदारी त्यांच्याकडेच देण्यात आली आहे.

## राज ठाकरे अन् उद्धव ठाकरे दोघंही संपलेले - नारायण राणे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

राजकीय वर्तुळात राज ठाकरे अन् उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. यावर आता खासदार नारायण राणे यांनी वक्तव्य केलंय. शिवसेनेच्या फेसबुक अकाउंटवर पोस्ट टाकण्यात आली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने ही पोस्ट करण्यात आली आहे. मुंबई आणि महाराष्ट्रासाठी एकत्र येण्याची वेळ आली आहे. शिवसैनिक मराठी अस्मितेच्या रक्षणासाठी तयार आहेत. यावर नारायण राणे यांनी म्हटलंय की, कोण एकत्र? कोणाला आवाहन केलंय? देणारे कोण, कोणाचं




आहे ते दुकान? त्यांचीच माणसं.

बऱ्याच पत्रकारांनी मला हा प्रश्न केलाय. पण मला भाष्य करायचं नाही, दोन भाऊ एकत्र आम्हाला नको आहेत का? अरे या. ते राजकारणात जर सक्रिय आहेत, आता राजकारणात दोन संपलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन काय होणार? काय राहतं त्यांच्याकडे, वीस झाले आमदार, पुढच्या वेळी पाच देखील नसणार. तर दुसऱ्यांकडे काहीच नाहीये. ते आमचे मित्र आहेत. त्यांचे वीस व्हावेत अन् यांचे पाच, असा टोला देखील नारायण राणे यांनी ठाकरे बंधूंना लगावला आहे.दरम्यान राज ठाकरे अन् उद्धव ठाकरे या दोघांनी देखील एकत्र येणार असल्याचे संकेत दिले होते. त्यामुळे दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगलेली आहे. दोघांची युती झाल्यास राजकीय समीकरणं बदलणार का, असा प्रश्न देखील उपस्थित होतोय. परंतु त्यांच्या एकत्र येण्याने काहीच फरक पडणार नसल्याचं नारायण राणे यांनी अप्रत्यक्षपणे आजच्या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना म्हटलंय.

माजी केंद्रीय मंत्री आणि भाजप खासदार नारायण राणे यांची आज पत्रकार परिषद पार पडली. यावेळी ते बोलत होते. नारायण राणे म्हणाले की, काही लोक कोंबडीवाले म्हणून उल्लेख करतात. पण भ्रष्टाचार करण्यापेक्षा धंदा केलेला बरा. कोविडच्या काळात औषधाला पंधरा टक्के औषधातून पैसे खाण्यापेक्षा धंदा बरा. जे खातात ते तुम्हाला माहित आहेत. लिस्टमध्ये अगदी मातोश्रीपासून त्यांची नावं आहेत. यांची चौकशी चालु आहे. कोरोना काळातील भ्रष्टाचारावरून नारायण राणे यांनी उद्धव ठाकरेंचं नाव न घेता टोला लगावला आहे.

मी १९८२ ला चिकनचा व्यवसाय मुंबईत सुरू केला. त्यावेळी चांगलं दुकान अगदी व्यवस्थित होतं. त्यावेळी मला ६४ हजार नेट यायचे खर्च जावून, असं देखील नारायण राणे यांनी म्हटलंय. उद्धव ठाकरे हे नारायण राणे यांना नेहमीच कोंबडी चोर म्हणून डिवचतात. यावर आता नारायण राणेंनी आक्रमक पवित्रा घेत उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेवर हल्ला चढवला आहे.

## मदरसे, मशिदी तीन दिवसांत ओस पडल्या! स्ट्राईक होणार या शक्यतेने दहशतवादी पळाले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७जम्मू काश्मीर**

पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय सैन्याने जम्मू-काश्मीरमध्ये सर्च ऑपरेशन सुरु केले आहे. घराघरात, गल्ली गल्लीत जाऊन दहशतवाद्यांचा शोध घेतला जात आहे. पुलवामा हल्ल्यावेळी भारताने पाकव्याप्त काश्मीरमध्ये जात दहशतवाद्यांची लाँच पॅड उध्वस्त केली होती. तशीच कारवाई आता होणार या भीतीने तेथील मदरसे, मशिदींमध्ये वास्तव्यास असलेल्या दहशतवाद्यांना बाहेर



काढण्यात आले आहे. यामुळे गिलगिट बाल्टिस्तानमधील मशिदी ओस पडल्या आहेत.

तीन दिवसांत या ठिकाणांवर राहत असलेले दहशतवादी हटविण्यात आले आहेत. पहलगाम दहशतवाद्यांची उरलेली जमिनही आता उध्वस्त केली जाणार असल्याची धमकी मोदी यांनी दिली आहे. तसेच सिंधू जल करार निलंबित करून भारत आता आक्रमक झाल्याचा इशारा देण्यात आला आहे. यामुळे दहशतवाद्यांमध्येच आता दहशत निर्माण झाली आहे. पाकिस्तानी नागरिकांना पाणी मिळणार नसल्याने त्यांच्यावर उपाशी राहण्याची वेळ येणार आहे.

भारत कोणत्याही क्षणी हल्ला करेल म्हणून पाकिस्तानी सैन्य गिलगिट बाल्टिस्तानमध्ये तैनात केले जात आहे. सावधगिरीचा उपाय म्हणून तेथील मदरसे, मशिदींमध्ये राहत असलेल्या दहशतवाद्यांना बाहेर काढण्यात आले आहे. दहशतवाद्यांचे म्होरके देखील पळाले आहेत. पाकिस्तानी सैन्याच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. आरोग्य कर्मचाऱ्यांच्याही सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. पीओके भारत ताब्यात घेण्यासाठी कारवाई करेल असेही पाकिस्तानला वाटत आहे. यामुळे तिथे युद्ध भडकू शकते, या शक्यतेने तेथील कर्मचाऱ्यांना, हॉस्पिटलना अलर्ट मोडवर राहण्यास सांगितले आहे.

## आतापर्यंत किती पाकिस्तान्यांनी देश सोडला? किती भारतीय मायदेशी परतले?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अटारी**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील संबंध बिघडले. पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारत सरकारने कठोर पावले उचलली असून, पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत देश सोडण्याचे आदेश दिले होते. आज (२७ एप्रिल) पाकिस्तानी नागरिकांसाठी भारत सोडण्याचा शेवटचा दिवस आहे. मात्र, वैद्यकीय व्हिसाधारकांना २९




एप्रिलपर्यंत मुदत आहे.

भारत सरकारच्या आदेशानंतर अटारी-वाघा आंतरराष्ट्रीय सीमेवरून पाकिस्तान आणि भारतातून परतलेल्या लोकांपैकी २४ एप्रिल रोजी २८ नागरिक त्यांच्या देशात परतले, तर १०५ भारतीय नागरिक भारतात परतले. २५ एप्रिल रोजी १९१ पाकिस्तानी नागरिक पाकमध्ये परतले आणि २८७ भारतीय नागरिक भारतात परतले. तर २६ एप्रिल रोजी ७५ पाकिस्तानी नागरिक आणि ३३५ भारतीय नागरिक आपापल्या देशात परतले.

दरम्यान, अटारी सीमेवर बहुतेक पाकिस्तानी नागरिकांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की ते त्यांच्या नातेवाईकांना भेटण्यासाठी भारतात आले होते. काही लोक लग्न समारंभांना उपस्थित राहण्यासाठी येथे आले होते, पण आता त्यांना लग्न समारंभांना उपस्थित न राहता घरी परतावे लागत आहे.


काही पाकिस्तानी नागरिकांनी दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आणि भारत पाकिस्तानमधील मैत्रीपूर्ण संबंधांची अपेक्षा व्यक्त केली.दरम्यान, भारत सरकारच्या मुदतीनंतर भारतात राहणारे पाकिस्तानी बेकायदेशीर मानले जातील आणि त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाणार आहे.

## काही लोक धार्मिक वळण देण्याचा प्रयत्न करतात

### पहलगाम हल्ल्यानंतर शरद पवारांचे परखड भाष्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

देशावर हल्ला होतो, तेव्हा मतभिन्नता नसते.काही लोक या परिस्थितीला धार्मिक विचार देण्याचा प्रयत्न करत आहेत, जे देशासाठी अतिशय धोकादायक आहे, असे वक्तव्य राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे



अध्यक्ष शरद पवार यांनी केले आहे. ज्येष्ठ समाजवादी नेते रावसाहेब पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

शरद पवार म्हणाले की, स्वातंत्र्य चळवळीच्या काळात समाजवादी लोक एकत्र आले होते आणि महाराष्ट्रात या विचारसरणीची मुळे खोलवर रुजली. पुणे जिल्ह्यात विशेषतः पुरंदर भागात समाजवादी लोकांचा प्रभाव अधिक राहिला आहे. या नेत्यांनी जाहिरातबाजी न करता, कुठल्याही अपेक्षा न ठेवता काम केले आहे. देश सध्या अडचणीतून जात आहे. पहलगाम येथे घडलेली घटना हा मोठा धक्का आहे. देशावर हल्ला होतो, तेव्हा मतभिन्नता नसते. आम्हाला विचारण्यात आले की, काय करावे, तेव्हा आम्ही सांगितले की, आज देश एक आहे, असे त्यांनी म्हटले. पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर झालेल्या सर्वपक्षीय बैठकीचा उल्लेख करत शरद पवारांनी सांगितले की, त्या बैठकीत काही कमतरता आमच्याकडून झाल्या, हे नेतृत्वाने मान्य केले. पण आज देश संकटात असताना त्या कमतरतांवर चर्चा करण्याची वेळ नाही.

## संपादकीय ......

# पाकची घटिका भरली

पहलगाम हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याचा स्पष्ट आरोप करत, केंद्र सरकारने पाकिस्तानच्या विरोधात कठोर पावले उचलण्याची घोषणा केली आहे. आता भारत आणि पाकिस्तानच्या उच्चायुक्त कार्यालयातील एकूण कर्मचार्यांची संख्या ५५ वरून ३० वर आणली जाणार आहे. अटारी-वाघा सीमेवरील तपासणी केंद्र तत्काळ बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. पाक नागरिकांना तत्काळ माघारी जाण्यास फर्मावले आहे. सिंधू जलकरार स्थगित केल्याची अधिकृत माहितीही भारताकडून पाकला देण्यात आली आहे.

पाकिस्तानची चारही बाजूंनी कोंडी करण्याचा निर्धार भारताने केला असून, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अब्देल फतेह-अल-सिसी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन करून, पहलगाम घटनेबद्दल शोक व्यक्त केला आणि या संकटात आम्ही भारतामागे उभे आहोत, असे सांगितले आहे. जगातील कोणत्याही प्रतिष्ठित देशाने पाकिस्तानची बाजू घेतलेली नाही आणि चीननेही आम्ही कोणत्याही स्वरूपाच्या दहशतवादाचा विरोधच करतो, असे म्हटले आहे.

यापूर्वी रशियाने पाकिस्तानसोबतच्या युद्धात सातत्याने भारताला पाठिंबा दिला होता आणि गेल्या अनेक वर्षांपासून इस्रायल आणि भारत संबंधही मजबूत आहेत. कारगिल युद्धाच्या वेळी इस्रायलने भारताला खूप मदत केली होती. गेल्या काही वर्षांत पाकने अमेरिकेशी मैत्री करण्याची धडपड केली; पण ती फोल ठरली. उलट अमेरिकेच्या दृष्टीने भारत ही मोठी बाजारपेठ असून, येथे त्या देशाची प्रचंड गुंतवणूक आहे. त्यामुळे संघर्षाच्या वेळी अमेरिका भारताच्या मदतीला येऊ शकते. देशाच्या शत्रूंनी केवळ नि:शस्त्र पर्यटकांवरच नव्हे, तर देशाच्या आत्म्यावर हल्ला करण्याचे दु:साहस केले आहे.

दहशतवादी कारवायांनी देशाचे मनोधैर्य खच्ची होणार नाही, उलट हल्ल्यातील दहशतवादी आणि त्यांच्या पाठीराख्यांना त्यांच्या कल्पनेपेक्षाही मोठी शिक्षा दिली जाईल. त्यांची उरलीसुरली ताकदही संपवण्याची वेळ जवळ आली आहे, असा खणखणीत इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. सरकारकडून यासंदर्भात होणार्या कोणत्याही संभाव्य कारवाईला सर्व पक्षांनी एकमुखी पाठिंबा दिला आहे. ज्या घटनेत २८ निरपराध नागरिकांचे हकनाक बळी गेले, त्याबाबत कोते राजकारण करणे चुकीचेच ठरले असते.

केंद्र सरकारने बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह सत्ताधारी आणि विरोधी पक्षांचे प्रमुख सदस्य उपस्थित होते. त्यावेळी गुप्तचर संस्थेच्या अधिकार्यांनी घटनेची तपशीलवार माहिती दिल्यानंतर, विरोधी सदस्यांनी काही प्रश्न विचारले व शंका उपस्थित केल्या. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सविस्तर उत्तरे दिली. निकोप वातावरणात चर्चा झाली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन, जबाबदारीचे वर्तन केल्याबद्दल विरोधी पक्षांचेही अभिनंदन करावे लागेल. अमरनाथ यात्रेवेळी पर्यटक बैसरनला जातात. त्यामुळे तेथे जूनपासून सुरक्षा व्यवस्था तैनात असते; पण यावेळी एप्रिलपासूनच पर्यटक तेथे जाऊ लागले होते.

हजारो पर्यटक जात असताना, याची माहिती ना पोलिसांना होती, ना सैन्यदलांना. केंद्रीय राखीव पोलिस दलही बेदखल होते. गुप्तचर संस्थांनाही याची वार्ता नव्हती, याकडे 'आप'चे खासदार संजय सिंह यांनी लक्ष वेधले आहे. काश्मीर खोर्यात त्रिस्तरीय सुरक्षा व्यस्था असताना, जेथे हजारो लोक जातात, त्याबाबत पोलिसांना कोणतीही माहितीच नसावी, हे कसे? असा रास्त सवाल राहुल गांधींनी विचारला. सुरक्षा व्यवस्थेकडून कुठल्या ना कुठल्या प्रकारची चूक झाली, हे गृहमंत्री शहा यांनी मान्य केले, हे बरेच झाले. चुका मान्य करण्यात काहीच कमीपणा नाही; पण सुरक्षा यंत्रणेतील फटी तातडीने बुजवण्याची गरज अधोरेखित झाली आहे. मुख्य म्हणजे, सर्व यंत्रणांमध्ये समन्वयाची गरज आहे.भारतावर या प्रकारचा हल्ला केला जात असतानाच, पाकिस्तानच्या शाहबाज शरीफ सरकारनेही पहलगाम घटनेचा निषेध करण्याचा नाटकीपणा केला. सिंधू जलकरारातील पाकच्या हक्काचे पाणी थांबवणे ही युद्धकृती असून, आम्हीही सिमला करार रद्द करत आहोत. तसेच, पाकची हवाई हद्द भारतीय विमानांना बंद करत असल्याचे पंतप्रधान शरीफ यांनी जाहीर केले. त्याने भारताचे फारसे काही वाकडे होणार नाही. भारताने पाकिस्तानसोबतचा जो काही व्यापार होता, तोही बंद केला आहे. पुलवामा हल्ल्यानंतर भारताने पाकमधून येणार्या मालावर २०० टक्के शुल्क लागू केल्यामुळे पाकचे कंबरडे मोडले होते.आताही सिंधूचे पाणी बंद झाल्यानंतर, पाकिस्तानच्या शेतीची वाताहत होणार आहे. भारताच्या एकूण व्यापारात पाकचा वाटा अर्ध्या टक्क्याच्या आसपास आहे. त्यामुळे पाकिस्तान आपल्या दृष्टीने नाममात्र आहे. गेल्या काही वर्षांत भारताचा जागतिक राजकारणावरील प्रभाव वाढला असून, त्या तुलनेत हा देश कोणाच्या खिजगणतीतही नाही. पाकिस्तानातील बलुचिस्तानमध्ये अशांतता आहे. सत्तेमधील पंजाबी वर्चस्वाविरुद्ध सिंध प्रांतात नाराजी आहे. अफगाणिस्तान व पाकिस्तान संबंध विकोपाला गेले आहेत. पाकव्याप्त काश्मीरची तेथील सरकार उपेक्षा करत असल्यामुळे तेथे अस्वस्थता आहे.

पाकिस्तानातील दहशतवादी सातत्याने त्या देशातच बॉम्बहल्ले करत असतात. २०१९ मध्ये भारताने पाकिस्तानवर प्रतिहल्ला चढवला, तेव्हा मिग-२१ विमान पाकच्या हवाईदलाने पाडले आणि विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांना ताब्यात घेतले. अभिनंदन यांची सुटका न केल्यास, पाकिस्तानवर क्षेपणास्त्रे डागण्यात येतील, असा दम भारताने देताच, त्यांची सुटका करण्यात आली. रशियाने युक्रेनवर आणि इस्रायलने गाझात आक्रमण केले, तरीही निषेधाचा स्वर काढण्यापलीकडे आंतरराष्ट्रीय संस्थांनी काहीही केलेले नाही. त्यामुळे उद्या भारताने चढाई करून पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेतला, तरी त्यास चीन वगळता कोणी आक्षेप घेईल, असे वाटत नाही. पहलगाम हल्ल्याचा निषेध करत जगातील प्रमुख देशांनी भारताकडे नोंदवलेली सहानुभूतीही येथे महत्त्वाची आहे. तेव्हा आपली घटिका भरत आली आहे, हे पाकिस्तानने लक्षात घेतलेले बरे!

# 'रोहयो' मजुरांच्या कामाचे मिळेल दाम; रक्कम थेट होणार खात्यात जमा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती–**
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत राज्यातील ३४ जिल्ह्यांत ५१ लाख १३ हजार ४४८ मजुरांची गेल्या जानेवारीपासून थकीत मजुरीची रक्कम देण्यासाठी निधी मंजूर देण्यात आली आहे.

संबंधित मजुरांच्या खात्यात १ हजार २४० कोटी रुपयांची रक्कम जमा करण्यात येणार आहे. त्यापैकी १२१ कोटी रुपये वितरित करण्यात आले असून, थकीत मजुरीची रक्कम मजुरांच्या खात्यात जमा करण्याची प्रक्रिया गुरुवारपासून सुरू करण्यात आल्याची माहिती नागपूर येथील रोहयो आयुक्त कार्यालयाच्या सूत्रांनी दिली.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामपंचायती आणि यंत्रणास्तरावर विविध कामे करण्यात येतात. रोहयो अंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना केलेल्या कामाची मजुरी आठवडाभरात देणे आवश्यक आहे.

मजुरीची रक्कम मजुरांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा केली जाते; परंतु रोहयोअंतर्गत काम करणाऱ्या राज्यातील सर्व ३४ जिल्ह्यांत ५१ लाख १३ हजार ४४८ मजुरांना गेल्या जानेवारी ते २० एप्रिलपर्यंतच्या कालावधीतील मजुरीची रक्कम मिळाली नाही.

केंद्र शासनाकडून १ हजार ३८८ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाल्यानंतर राज्यातील ५१ लाख १३ हजार ४४८ मजुरांची थकीत मजुरीची १ हजार २४० कोटी रुपयांची रक्कम मजुरांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे.

### मजुरीची रक्कम खात्यात

रोहयोअंतर्गत राज्यातील ५१ लाख १३ हजार ४४८ मजुरांची थकीत मजुरीची १ हजार २४० कोटी रुपयांची रक्कम संबंधित मजुरांच्या खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

२५ एप्रिलपर्यंत १२१ कोटी रुपयांची मजुरीची रक्कम मजुरांच्या खात्यात जमा करण्यात आली.

थकीत मजुरीची सर्व रक्कम मजुरांच्या खात्यात जमा करण्याची प्रक्रिया येत्या सात दिवसांत पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती नागपूर येथील रोहयो आयुक्त कार्यालयाच्या सूत्रांनी दिली.

# उन्हाळी भुईमुंगासाठी तुषार सिंचन करा, २० टक्के उत्पादन वाढवा!

दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक १

उन्हाळी भुईमुंगासाठीतुषार सिंचन पद्धत फायदेशीर ठरते. तुषार सिंचनामुळे पाण्याची बचत होते आणि पिकांची वाढ चांगली होते, तसेच सिंचनाचे व्यवस्थापन सोपे होते. उन्हाळी भुईमुंगासाठी तुषार सिंचन कसं फायद्याचे आहे, हे जाणून घेऊयात....

उन्हाळी भुईमुंगासाठी तुषार सिंचन

तुषार सिंचन पद्धतीची सिंचन कार्यक्षमता ८०-८२ टक्के इतकी आहे.

तसेच ३०-३५ टक्के पाणी बचत आणि १५ ते २० टक्के उत्पादनात वाढ होते.

तुषार सिंचनाने पिकाभोवती सूक्ष्म वातावरण निर्मिती होऊन पीक जोमदार वाढते.

जमीन भुसभुशीत व वाफसा स्थितीत राहिल्याने आऱ्या लागण्याचे व पोसण्याचे प्रमाण वाढते. पिकाची वाढ निरोगी होते.

रोग-किडींचा प्रादुर्भाव कमी होतो, त्यामुळे पाल्याची प्रत सुधारल्याने उत्तम प्रतीचा चारा मिळतो.

या पद्धतीत दोन नोझलमध्ये साधारणपणे १२ ु १२ मीटर अंतर ठेवावे. यासाठी २ ते ३.५ कि. ग्रॅम/चौ.मी. इतका दाब आवश्यक आहे. तर पाणीफवारणीचा वेग साधारण ताशी १.५ ते २ सें.मी. इतका असतो.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

कृषी विशेष




तुषार सिंचन पद्धतीने पाणी देताना तुषार संचाचा पाणी देण्याचा, मुरण्याचा वेग साधारणपणे १.५-२.० सें.मी. तास इतका असतो.

हे विचारात घेऊन साधारणपणे ५० मिमी (५ सें.मी) बाष्पीभवन झाल्यानंतर ५ सें.मी खोलीचे पाणी देण्यासाठी संच दोन ते तीन तास चालवावा.

गादीवाफ्यावर भुईमूग लागवड किंवा प्लॅस्टिक आच्छादनावर भुईमूग लागवड असेल, तर तुषार सिंचन पद्धत अधिक फायदेशीर ठरते.

ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी




## तुम्हाला 'टेंभुर्णे' फळ माहित आहे का? वाचा त्याचे आरोग्यदायी फायदे

आरोग्यासाठी उपयुक्त असलेले 'टेंभुर्णे' हे पारंपरिक फळ आज दुर्लक्षित बनले आहे. पूर्वी लहान मुले माळरानातून हे फळ आनंदाने गोळा करत, राखेत पिकवून त्याची गोडसर चव घेत असत. या फळाचे अनेक फायदे आहेत. वाचा सविस्तर

आरोग्यासाठी उपयुक्त असलेले 'टेंभुर्णे' हे पारंपरिक फळ आज दुर्लक्षित बनले आहे. पूर्वी लहान मुले माळरानातून हे फळ आनंदाने गोळा करत, राखेत पिकवून त्याची गोडसर चव घेत असत. या फळाचे अनेक फायदे आहेत. हे फक्त एक फळ नाही, तर आरोग्याचा नैसर्गिक खजिना आहे. अशा या स्थानिक फळांची शाळा, आहारतज्ज्ञ आणि प्रशासनाच्या माध्यमातून पुन्हा ओळख करून देणे गरजेचे आहे.

अनेक जीवनसत्त्व असलेले फळ, रोगप्रतिकारक शक्तीही वाढवते. टेंभुर्णे फळात अँटीऑक्सिडंट्स (-पींळेळवरपी), फायबर्स, तसेच जीवनसत्त्व 'ए' आणि 'सी' भरपूर प्रमाणात असते.

हे फळ पचन सुधारण्यास मदत करते, रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि मधुमेहासारख्या आजारांवरही उपयुक्त मानले जाते. ग्रामीण भागात हे फळ प्रसिध्द आहे. टेंभुर्णी हे फळ मार्च एप्रिलच्या महिन्यामध्ये मोठ्या प्रमाणात येतात. या फळामुळे शरीरातील उष्णता कमी होण्यास मदत मिळते.((ढशालहीपश क्षशरश्रींहू ऱ्रींळीं))

**'या' भागात मोठ्या प्रमाणात आढळते**

'टेंभुर्णे' हे फळ महाराष्ट्रात मुख्यत: विदर्भ आणि मराठवाडा भागात आढळते, विशेषत: ग्रामीण व माळरान भागात हे फळ मोठ्या प्रमाणात पाहायला मिळते. याला ग्रामीण भाषेत टेंभुर्णी, टेंभुर्णा, टेंभुरही म्हणतात. आरोग्यासाठी उत्तम असे फळ मानले जाते.

**'टेंभुर्णे' फळाचे आरोग्यदायी फायदे**




**पचनक्रिया सुधारते :** 'टेंभुर्णे' फळात फायबरचे प्रमाण जास्त असल्याने पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठता टाळण्यास मदत करते.

**रोगप्रतिकारशक्ती वाढवते :** यात अँटीऑक्सिडंट्स असतात, जे रोगप्रतिकारशक्ती वाढवतात आणि हानिकारक घटकांपासून संरक्षण करतात.

अँटीऑक्सिडंट्सचा स्रोत : हे फळ अँटीऑक्सिडंट्सचा चांगला स्रोत आहे, ज्यामुळे शरीरातील पेशींची ज्वलनशील प्रक्रिया कमी होते.

**रक्तदाब नियंत्रित करते :** 'टेंभुर्णे' फळात पोटॅशियमचे प्रमाण जास्त असल्याने ते रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते.

**हृदयविकार टाळण्यास मदत करते :** अँटीऑक्सिडंट्स आणि फायबरच्या मदतीने हे फळ हृदयविकार होण्याचा धोका कमी करते.

**त्वचेसाठी चांगले :** 'टेंभुर्णे' फळात व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे त्वचेला निरोगी ठेवण्यास मदत करतात.

# कुख्यात आरोपी 'एमपीडीए' कायद्यान्वये स्थानबद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अचलपूर:** पो. स्टे. परतवाडा अंतर्गत कुख्यात आरोपी शेख सादीक ऊर्फ चिची शेख सलीम (२२) रा. खिरणी बगिचा, परतवाडा याला पोलिसांनी एमपीडीए कायद्यान्वये शहरातून स्थानबध्द केले आहे. त्याच्यावर अनेक गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याने पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी व कुख्यात आरोपीचा गुन्हेगारी वृत्तीस आळा घालण्यासाठी पोलिस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांनी त्यास एमपीडीए कायद्यान्वये एक वर्षाकरिता स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव जिल्हा दंडाधिकारी, अमरावती यांच्याकडे सादर केला होता. सौरभ कटियार जिल्हा दंडाधिकारी यांनी कायदेशीर बाबींची पडताळणी करून तसेच नमूद आरोपीअसल्याची स्वत:चे स्त्रोतामार्फत खात्री करुन त्यास अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध ठेवण्याबाबतचा आदेश २३ एप्रिलरोजी पारित केला आहे. त्या आदेशाची तामील करुन त्यास जिल्हा मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे स्थानबद्ध करण्यात आले आहे. सदरची कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत तसेच सहा. पोलिस अधीक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हेशाखा प्रमुख पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात सहा. पोलिस निरीक्षक श्रीकांत कडू, पोउपनि विष्णुपंत राठोड, पोहेकॉ अमोल देशमुख तसेच पोलिसस्टेशन परतवाडा येथील ठाणेदार पोलिस निरीक्षक सुरेश मस्के, सहा. पोलिस निरीक्षक प्रशांत जाधव व डीबी पथकातील अंमलदार यांनी पार पाडली.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प ठरतेय शेतकऱ्यांसाठी वरदान !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७शिराळा :** सन २०२४-२५ मध्ये यावली शहीदगावाची महाराष्ट्र शासन कृषी विभाग व जागतिक बँक अर्थसाहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोन मध्ये निवड झाली असून सदर प्रकल्पांतर्गत नयावली शहीद येथील १५ ते २१ एप्रिल २०२५ दरम्यानयाव ग्राम कृषी विकास समिती अंतर्गत लोकसहभागातून सूक्ष्म नियोजन करून गाव स्तरीय हवामान अनुकूलन आराखडा तयार करण्यात आला हवामान बदलाच्या संकटांचा सामना करण्यासाठी आणि गावाना अधिक सक्षम बनवण्यासाठी राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प 'पोकरा लोकसहभाग' योजनेंतर्गत सूक्ष्म नियोजन, गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा तयार करण्याचे काम व त्याकरिता यावली (श.) येथे विविध स्तरावर प्रभावी ठरत आहे.

ग्राम कृषी विकास समिती सदस्य आणि स्वयंसेवक यांच्या सहकार्यामधून विविध उपक्रम व कार्यक्रम राबवण्यात आले. त्यामध्ये ग्राम कृषी विकास समिती सभा, मशाल फेरी, गाव बैठक, मुलाच्या शाळेतील प्रभात फेरी, शाळेतील निबंध स्पर्धामध्ये माझ्या स्वप्नातील शेती आणि शेतकरीतसेच चित्रकला स्पर्धामध्ये माझ्या स्वप्नातील गाव हे विषय घेऊन स्पर्धा राबवण्यात आल्या. त्यानंतर गाव नकाशा, लक्ष गटचर्चा, शिवार फेरी, श्रमदान, माती नमुना घेणे, महिला सभा, पशुधन मूल्य साखळी संवर्धन, संसाधन नकाशा, पीकनिहाय आराखडा, ग्राम कृषी विकास समिती सदस्य सभा असे विविध उपक्रम राबवण्यात आले. या कार्यक्रमामधून एकंदरीत तयार होत असलेला हवामान अनुकूलन आराखडा गावासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

या योजनेमुळे केवळ नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण होणार नाही, तर गावांमधील सामाजिक आर्थिक विकास साधण्यासदेखील मदत होणार आहेत्याकरिता ग्राम कृषी विकास समितीचे पदसिद्ध अध्यक्ष सरपंचा सौ. शिल्पाताई तुषारराव खवलेतसेच उपसरपंच नितीन रंगराव पाचघरे, विविध कार्यकारी सहकारी संस्था अध्यक्ष पंकज देशमुख, सुनील देशमुख, समिती सदस्य आणि ग्रामविकास अधिकारी दिनेश मोहोड इतर सर्व सदस्य, स्वयंसेवक तसेच कृषी मित्र सुनील लंगडे, रवींद्र वानखडे, कल्पक अंबडकर, रोशन खवले, अक्षय भोपळे सर्व ग्रामपंचायत कर्मचारी यावली याचे विशेष सहकार्य लाभले. मंडळ कृषी अधिकारी नीता कवाने व कृषी पर्यवेक्षक कु. शुभांगी बोडे यांचे सदर नियोजनाकरिता विशेष सहकार्य लाभले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

रविवार दि. २७ एप्रिल २०२५ शहर/ग्रामिण

# कृषी फीडरवर नियमित आठ तास विजेचे संकट !

## कृषी फीडर प्रभावित : अघोषित भारनियमाने शेतकरी त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती–** कृषी फीडरवर नियमित अखंडित आठ तास विजेचे धोरण महाराष्ट्र शासनाने दिले. मात्र अख्ख्या महाराष्ट्रभर वीज खंडित व कृषी फीडरवर अनियमित अघोषित भारनियमनामुळे शेतकरी त्रस्त ठरले आहेत. ऐन वेळेवर अत्यावश्यक भारनियमन केले जात असल्याने शेतकऱ्यांत असंतोष पसरत आहे.

राज्य शासनाच्या वतीने शेतकऱ्यांना आठ तास वीज देण्याचे धोरण ठरले असले, तरी प्रत्यक्षात मात्र पाच ते सहा तासांच्या वर वीज मिळत नाही. वाढत्या उन्हामुळे पाण्याची सुद्धा नितांत गरज पिकांना वाढली आहे. दिवसा व रात्रीला आठ तासांचे विजेचे धोरण ठरले आहे, परंतु दिलेल्या वेळापत्रकानुसार वीज मिळणे कठीण झाले आहे. रात्री बारा वाजेचे वेळापत्रक कोलमडले असून रात्रीला एक ते दोन वाजेपर्यंत इमर्जन्सी भारनिमामुळे वीज सोडण्यात येते. अख्खा रात्रभर शेतकरी शेतात डोळे फोडत आहेत. रानटी डुक्कर आणि स्वापदांच्या सोबतीने अख्खी रात्र शेतात काढावी लागत आहे.



### किमान मे महिना सुरळीत वीज पुरवा

उन्हाळी हंगाम अंतिम टप्प्यात पोहोचलेला आहे. किमान २५ ते ३० दिवस सुरळीत वीज मिळाल्यास उन्हाळी हंगाम पूर्णत्वाला जाण्याची शक्यता दाट आहे. तीव्र उन्हाळ्यामुळे पाण्याची पातळी सुद्धा खालावली आहे. ऊन तापत असल्याने पिकाला पाणी सुद्धा अधिक लागते. तेव्हा ठरलेल्या वेळापत्रकानुसार किमान आठ तास तरी वीज एक महिना पुरवावी. अशी आग्रही मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

**शासनाचे दुटप्पी धोरण.**

काही झाले तरी शेतीला आठ तास वीज सुरळीत देण्याचे शासनाच्या वतीने वारंवार सांगण्यात येत आहे. मात्र, प्रत्यक्षात धोरणाची अंमलबजावणी होत नाही. सगळीकडेच वीज विभागात वीज टंचाईचा सामना सुरू आहे. गरज नसताना अधिवेशन काळात मात्र बारा तास वीज पुरविली गेली. अधिवेशन संपताच पुन्हा आठ तासांवर वीज झाली. गरजेच्या वेळी आठ तास सुद्धा वीज मिळणे दुरापास्त ठरत आहे.

# चिखलदऱ्यातील स्काय चे काम प्रगतीपथावर

## पुढील वर्षाच्या मार्च महिन्यापर्यंत स्कायवॉकचे काम होणार पूर्ण

विदर्भ प्रजासत्ताक

दि.२७ चिखलदरा

पर्यटनस्थळावर जगातील सर्वाधिक लांबीच्या, परंतु तेवढ्याच रखडलेल्या स्कायवॉकचे काम आता युद्धस्तरावर सुरू झाले आहे. पुढील वर्षी मार्च २०२६ ला ते पूर्ण होण्याची शक्यता आहे. २२ पैकी आतापर्यंत १४ केबल ओढून पूर्ण झाले. खोल दरीच्या मधोमध काचेवर स्कायवॉक राहणार आहे. प्रकल्प पूर्ण होताच लाखो पर्यटकांची पावले चिखलदऱ्याकडे

मागील आठ वर्षांपासून बहुप्रतीक्षित आणि सर्वाधिक ४०७मीटर लांबीचा स्कायवॉक प्रकल्प मेळघाटातील चिखलदरा येथे होत आहे. ७२ टक्के काम काम पूर्ण झाल्यानंतर नॅशनल वाइल्ड लाइफ बोर्डचे आक्षेप पुढे आल्याने हे काम रखडले होते.आता मात्र स्कायवॉकचे काम युद्धस्तरावर सुरु झाले आहे. सत्तांतरानंतर अनेक अडथळे पार करत स्काय वॉक होणार की नाही, याबाबत प्रश्नचिन्ह संपले असून प्रगतिपथावर आहे.

**केवळ आठ तार ओढणे**



**बाकी–** स्कायवॉकसाठी एकूण २२ पैकी १४ केबल या ठिकाणी ओढण्यात आले आहेत. पुढील वर्षी मार्च २०२६ पर्यंत काम पूर्ण होऊन तो पर्यटकांच्या सेवेत असणार आहे.चिखलदरा येथील हरिकेन आणि गोरघाट या दोन महत्त्वाच्या पॉइंटदरम्यान स्कायवॉक राहणार आहे. यासाठी दोन्ही पॉइंटवर ५०० मीटर उंच मनोरे उभारण्यात आले आहेत.चिखलदरा स्कायवॉकची लांबी सर्वाधिक ४०७ मीटर आहे. जगात स्वित्झर्लंड आणि चीनमध्ये अशा स्वरूपाचे स्कायवॉक आहेत. स्वित्झर्लंडच्या स्कायवॉकची लांबी ३२७मीटर, तर चीनमधील स्कायवॉकची लांबी ३०७ मीटर आहे.

**महत्त्वाकांक्षी प्रकल्प**

काय या महत्वाकांक्षी प्रकल्पाने स्कायवॉक साकार होणार आहे. चिखलदऱ्यावरील त्यांचे विशेष प्रेम पाहता, प्रकल्पाला ८ फेब्रुवारी २०१९ ला सुरुवात झाली होती आणि हा प्रकल्प ९ फेब्रुवारी २०२१ ला पूर्ण होणार होता.

# डॉ. प्रिती यांना विद्यापीठाचा 'चावला युवा महिला संशोधक पुरस्कार'

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या उपयुक्ततेचा १ मे रोजी होणार प्रदान

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२७ अमरावती –** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विद्यापीठाला दिला जातो 'कल्पना चावला युवा महिला संशोधन पुरस्कार – २४' अचलपूर ० जगदंबिक भौतिक विभागाचे सहायक डॉ. प्रिती किशोर टवलारे यांना आहे. दि. १ मे, २०२५ रोजी विद्यापीठात आयोजित सत्कार समारंभ सन्मानपूर्वक त्यांना हा पुरस्कार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या शुभहस्ते प्रदान केली जाते.

डॉ. टवलारे लोकसभा पाच शिक्षक पदावर कार्यरत आहेत. विद्यापीठ त्यांना भौतिकशास्त्र विषय पी.जी. केले होते. त्यामध्ये तीस–या



माझी जोड. त्यांचे पंचवीस संशोधक पेपर नामांकित जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या संडाला ३ पेटेंट प्राप्त आणि आर.जी.एस.टी.सी. कडून २.५० लक्ष आणि डी.एस.टी. त्यांच्याकडून १८.३० लक्ष दोन संशोधकांचे पुनरावलोकन करत आहेत. सर्वोत्तम पेपर ईने त्यांना दोनदा सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या खाती रेव्हू ऑफ जर्नल ६ आणि एका संपूर्णपणे त्यांनी संपादन केले आहे. तीन पुस्तके त्यांचे चॅप्टर प्रकाशित आहेत. २१ राष्ट्रीय व परिषदांमध्ये त्यांचा समावेश आहे. उत्कृष्ट संशोधन डॉ. प्रिती किशोर टवलारे यांना विद्यापीठाचा 'कल्पना चावला युवा महिला संशोधक पुरस्कार – २०२४' ने महाराष्ट्र दिनी होणा–या सत्कार समारंभाला गौरवन्वित केले आहे.





# तुषार भारतीय यांच्या घरी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची सदिच्छा भेट!!

**दि.२६अमरावती–**भाजपा प्रदेशाध्यक्ष व जिल्ह्याचे लोकप्रिय पालकमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी तुषार भारतीय यांच्या घरी सदिच्छा भेट दिली.यावेळी औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले. विविध विषयांवर चर्चा ही यावेळी झाली. पालकमंत्री बावनकुळे यांनी तुषार भारतीय यांच्या आई वडिलांची भेट घेत आस्थेने विचारपूस केली.या भेटी दरम्यान तुषार भारतीय यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांचा शाल,श्रीफळ देत सत्कार करत पुढील वाटचालीस शुभेच्छा ही दिल्यात.यावेळी आ.श्रीकांत भारतीय,मा. मंत्री प्रवीण पोटे पाटील, मा. महापौर चेतन गावंडे,जयंत डेहनकर उपस्थित होते.

# राजकमल चौकात हिंदु जनजागृती समितीचे तीव्र निदर्शने




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती–** पहेलगामध्ये दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांवर त्यांचा धर्म विचारून २६ जणांची निर्दयीपणे हत्या केली. या हल्ल्याचा तीव्र निषेध करीत हिंदु जनजागृती समितीच्या वतीने राजकमल चौकात शनिवारला सायंकाळी तीव्र निदर्शने करण्यात आली. आता केवळ निषेध न करता भारत सरकारने इस्राइलचा आदर्श घेत अतिरेक्यांचा व त्यांच्या पाठिराख्या पाकिस्तानला जन्माची अद्दल घडेल अशी कठोर सैन्य कारवाई करावी, अशी मागणी यावेळी केली. यात संपूर्ण भारतीय नागरीक हे सरकारच्या पाठिशी ठामपणे उभे आहेत, असे यावेळी हिंदू जनजागृति समितिचे निलेश टवलारे यांनी सांगितले.एकूण काश्मीरमधील परिस्थिती आणि तेथील राजकीय नेत्यांनी केलेलीराष्ट्रविरोधी वक्तव्ये पाहता तेथे तात्काळ राष्ट्रपती राजवट लागू करण्यात यावी. काश्मीर खोऱ्यामध्ये व्यापक ' कोंबिग ऑपरेशन' राबवून अतिरेक्यांचा बीमोड करावा. पाकव्याप्त काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे याची पुनः स्पष्टघोषणा करून त्याचे विलीनीकरण करण्याची कार्यवाही तातडीने सुरू करावी, अशा मागण्याही या वेळी करण्यात आल्या.या आंदोलनात नीलेश टवलारे समन्वय, हिदु जनजागृति समिति, मानव बुद्धदेव, दिलीप बेलबागकर, हरीश नाडे,वृंदा मुक्तेवार, धिरज चांडक, विनोद सरवटे, रोशनी वाकडे, रंजना पांडे, अभिषेक दीक्षित, मेघमाला चौबै, रश्मि गांधी, राज दुबे, तुषार वानखेडे आदींसह हिंदु जनजागृती समितिचे व सनातन संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याने उचलले टोकाचे पाऊल

## राहत्या घरी गळफास लावून संपविले जीवन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७नांदगाव पेठ –** येथील गजानन सिताराम कापडे (वय ४२) या शेतकऱ्याने शनिवारी (दि. २६ एप्रिल) सायंकाळी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्याकडे केवळ अडीच एकर शेती होती आणि शेतीतून होणाऱ्या अल्प उत्पन्नावरच त्यांचा उदरनिर्वाह सुरू होता. मात्र, सलग काही वर्षे अस्मानी संकटे कोसळल्याने शेतीचे उत्पादन ठप्प झाले होते.यामुळे गजानन कापडे यांनी स्थानिक बँका आणि बचत गटांकडून कर्ज घेतले होते. मात्र पीक नुकसान व उत्पन्नात घट झाल्याने ते कर्जाची परतफेड



करण्यास असमर्थ ठरले. कर्जाच्या वाढत्या ओझ्यामुळे ते मानसिक तणावाखाली होते. अखेर, या विवंचनेतून त्यांनी शनिवारी दुपारी अंदाजे पाच वाजता राहत्या घरी गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली.गजानन कापडे यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्या मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने या घटनेची तातडीने दखल घ्यावी आणि कापडे कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत व आधार द्यावा, अशी मागणी कुटुंबीय व ग्रामस्थांकडून होत आहे.

# कुरड्या, वेफर्स, बटाट्याचे पापड बनवण्याची लगबग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७वरुड–** सध्याच्या वाढत्या उन्हाचा सदुपयोग करत महिला वर्षभर लागणारे वाळवणाचे विविध पदार्थ बनविण्यात व्यस्त आहेत. शहरात वाळवणासाठी जागा आणि वेळेची वानवा असली तरी महिला थोडा वेळ काढत खास उपासासाठी साबुदाण्याच्या वड्या, कुरड्या, वेफर्स, बटाट्याचे पापड करताना दिसत आहेत.

अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात घराबाहेर अंगण आणि भरपूर ऊन असल्याने एप्रिल, मे महिन्यात वाळवणाचे विविध पदार्थ बनविणे, धान्य उन्हात वाळवून ठेवणे, यासाठी लगबग सुरू असते. पावसाळ्याच्या बेगमीसाठी केले जाणारे हे वाळवणाचे पदार्थ बाजारात तयार मिळू लागल्याने शहरी संस्कृतीमध्ये



अशा कामांना अभावानेच वेळ दिला जातो. तरीही काही महिला आजही वाळवणासाठी जागा करत आहेत.

# खासगी खोदकामातच निघाले जलवाहिनीच्या वापराचे पाइप

## पालिकेचा गलथान कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अचलपूर**

अचलपूर शहरात पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या दुर्लक्षामुळे आणखी एक गंभीर प्रकार समोर आला आहे. शहरातील एका खासगी भूखंडावर सुरू असलेल्या खोदकामादरम्यान जमिनीच्या आत पालिकेच्या मालकीचे पाइप दिसून आले आहे. जलवाहिनीसाठी वापरल्या जाणाऱ्या या पाइपची किंमत काही लाख रुपये आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाच्या कामकाजातील गलथानपणा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

संबंधित भूखंडावर बांधकामाच्या पूर्वतयारीसाठी खोदकाम सुरू आहे. हे खोदकाम करताना जमिनीखाली मोठ्या प्रमाणात लोखंडी पाईप असल्याचे कामगारांच्या लक्षात आले. यापूर्वी शहरातील एका शाळा संचालकाने पालिकेचे काही पाईप स्वत:ची मालमत्ता समजत सांडपाणी काढण्यासाठी परस्पर टाकले होते, हे विशेष. त्यानंतर पालिका प्रशानाच्या गलथान कारभाराचा हा दुसरा नमूना पुढे आला आहे. याचा अर्थ असा की जमिनीखाली गाडले जाईपर्यंतही पालिका प्रशासनाला आपल्या संपत्तीची माहिती नव्हती. दरम्यान, वेगवेगळ्या भागातील रहिवासी नागरिकांकडून पुढे आलेल्या माहितीनुसार पालिका प्रशासनाने लाखो रुपये किंमतीचे जलवाहिनी म्हणून वापरले जाणारे पाईप शहरातील विविध भागात बेवारस पसरवून ठेवले आहेत. दरम्यान, सार्वजनिक मालमत्तेचा अशाप्रकारे खासगी जमिनीत साठा करून ठेवला जाणे म्हणजे भ्रष्टाचार आणि अपारदर्शक कामकाजाचे प्रतीक असल्याचीही टीका होत आहे. आता हे पाईप चुकीने जमीनीत गाडले गेले की ते जाणीवपूर्वक लपवण्यासाठी तसे केले गेले, याचाही छडा लावणे गरजेचे



आहे. पालिकेने सध्या याबाबत कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. दरम्यान, स्थानिक नागरिकांसह येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

नगरपालिकेची संपत्ती अशाप्रकारे बेदखल करणे योग्य नाही. ही चूक नेमकी कुणाची आहे, याचा तपास केला जाईल. शिवाय पालिकेच्या जलवाहिनीचे किती पाईप कुठे–कुठे पडलेले आहेत. त्यांची सध्याची स्थिती काय आहे, याची मी लगेच चौकशी सुरु करतो. –

**धीरज गोहाड,**

प्रशासक तथा मुख्याधिकारी, न.प. अचलपुर.

# जिल्ह्यात गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार योजनेला वेग : शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन




विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७अमरावती

शासनाची महत्वाकांक्षी गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. ही योजना शेत जमीन सुपीक करणे आणि धरणातील पाणीसाठा वाढवणे यासाठी उपयुक्त असल्याने शासनस्तरावर जाणीवपूर्वक राबविल्या जात आहे. या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.तिवसा तालुक्यातील विरगव्हाण आणि दिवाणखेड येथे सुरु असलेल्या कामांना जिल्हाधिकारी सौरभ कटियार आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी भेट देऊन पाहणी केली.या भेटीदरम्यान जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय अधिकारी, अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी, ग्रामपंचायत सरपंच आणि लाभार्थी शेतकरी उपस्थित होते. ही कामे अशासकीय संस्थांमार्फत केली जात आहे. या योजनेचा मुख्य उद्देश तलावातील गाळ काढून पाणी साठा वाढवणे आणि त्याचबरोबर अत्यंत सुपीक गाळ शेतकऱ्यांना शेतीसाठी उपलब्ध करणे हा आहे. यामुळे कृषी उत्पादकता वाढण्यास मदत होणार आहे.सध्या जिल्ह्यात एकूण २४४ कामे मंजूर असून त्यामधून सुमारे ४५ लक्ष घनमीटर गाळ काढण्याचे उद्दिष्ट आहे. या योजनेचा शेतकरी लाभ घेत असून, स्वतःच्या खर्चाने गाळ वाहून नेण्यासाठी लघु पाटबंधारे विभागामार्फत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांनी देखील या योजनेचा लाभ घेऊन आपली शेती सुपीक करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी केले आहे.

# आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे यांच्या नेतृत्वात शहरातील अक्का पाणी वितरण करणाऱ्या व्यवसायकांची पिण्या योग्य पाणी तपासणी मोहीम सुरु

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७अमरावती

अमरावती शहरात सर्व्हे नुसार ९० ते जास्त प्रमाणात अक्का चे माध्यमातून शहरात प्रत्येक दुकानात , प्रत्येक आस्थापनात व सर्व मंगल कार्यालय , लॉन , खानवळ व इतर ठिकाणी पाणी चे कॅन जातात परंतु डॉ विशाल काळे यांच्या निर्देशांत असे आले की जे पाणी अक्का चे कॅन मधून पितात ते नागरिक आजारी पडतात व त्यांना ज्या प्रमाणे



पाण्यापासून योग्य ते मिनरल पाणी मिळावे व शरीराला योग्य पाणी मिळत नाही अश्या तक्रारी प्राप्त झाल्या मुळे क्शन मोड वर येऊन त्यांनी सर्व पाणी वितरण करणाऱ्या अक्का यांच्या दुकानात तपासणी करण्यात साठी स्वतः जाऊन पाण्याअधे किती टीडीएस आहे ,केमिकल किती आहे हे तपासणी मोहीम राबविण्याची सुरवात झाली आहे.

ज्या अक्का चे पाणी पिण्यास योग्य नसेल त्यांचे वर साथ रोग कायद्यानुसार कार्यवाही करण्यात येईल व कोणतीही कारण मान्य करण्यात येणार नसल्याचे आरोग्य अधिकारी डॉ विशाल काळे महानगर पालिका यांनी जाहीर आवाहन केले आहे व सर्व खानावळ, हॉटेल ,वाइन शॉप., बिअर शॉप , लॉजिंग, व खाद्य पदार्थ निर्माण करणाऱ्या कंपन्या व विकणारी आस्थापना यांनी त्वरित आरोग्य विषयक प्रमाणपत्र घेण्याचे व्यावसायिक यांना कळवण्यात आले आहे.सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू आले असून उष्ण वातावरणाचा फायदा घेत मिनरल वॉटरच्या नावाखाली कुठलेही पाणी बॉटल तसेच पाऊचमध्ये पॅकींग करून मिनरल वॉटरच्या नावाखाली विकून पैसे लुबाडत आहेत. हा सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याचा गोरखधंदा सध्या जिल्ह्यात सुरु आहे.

# विदर्भाला पावसाचा ‘हाय अलर्ट’, आज गारपिटीचा इशारा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७नागपूर

राज्यात आणि विशेषकरुन विदर्भात तापमानाचा पारा चांगलाच चढला होता. विदर्भातील तापमान ४६ अंश सेल्सिअसपर्यंत जाऊन पोहोचले होते. तब्बल तीन शहरे ४५ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक तर अधिकांश शहरांमध्ये पारा अंश सेल्सिअसवर गेला होता. मध्य महाराष्ट्र तसेच मराठवाड्यात देखील तापमानाने बरेच रेकॉर्ड मोडले होते. याठिकाणीदेखील अनेक शहरांमध्ये पारा ४४ अंशापर्यंत जाऊन पोहोचला होता. संपूर्ण राज्यच उष्णतेत होरपळत असताना हवामान खात्याने आता दिलासा देणारा अंदाज व्यक्त केला आहे. भारतीय हवामान खात्याने येत्या तीन ते चार दिवसांसाठी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे.

भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, राज्यात येत्या तीन ते चार दिवसात संमीश्र स्वरुपाचे हवामान राहण्याची शक्यता आहे. विदर्भात रविवार आणि सोमवार असे दोनही दिवस गारपिटीचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.



याशिवाय वादळी वाऱ्यासह आणि ढगांच्या गडगडासह पावसाचा अंदाज देखील वर्तवण्यात आला असून काही जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मराठवाडा, मध्य महाराष्ट्र येथेही उष्णदमट हवामानासह पावसाची देखील शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भातील चंद्रपूर तसेच गडचिरोली जिल्ह्याला रविवारी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

विदर्भ तसेच मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना येलो अलर्ट तर २८ एप्रिल म्हणजेच सोमवारी भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्ये तसेच मराठवाडा अन् दक्षिण महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# सेवा हक्क अधिनियमाच्या दशकपूर्तीनिमित्त सेवा हक्क दिन

## १२ मे पर्यंत सेवा पंधरवड्याचे आयोजन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७अमरावती

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५च्या अंमलबजावणीला दहा वर्षे पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने दि. २८ एप्रिल हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. तसेच दि. २८ एप्रिल १२ मेपर्यंत सेवा पंधरवडा राबविण्यात येणार आहे.सेवा हक्क दिनानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. मुख्यमंत्री यांच्या हस्ते लोकसेवा प्रदान करण्याच्या कामगिरीमध्ये उल्लेखनीय काम



केलेल्या जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे.त्याचप्रमाणे जिल्हास्तरावर सेवा प्रदान करण्याच्या कामगिरीत उल्लेखनीय कार्य केलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी सर्व पालकमंत्री, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था व नागरिकांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे ग्रामपातळीवर सर्व ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. यावेळी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या ठळक वैशिष्ट्यांचे वाचन करण्यात येणार आहे.सेवा हक्क दिनाच्या निमित्ताने सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांना सेवेची शपथ देण्यात येणार आहे.सेवा पंधरवड्यामध्ये दि. २५ एप्रिल २०२५ पर्यंतच्या प्रकरणावर कार्यवाही पूर्ण करण्याची सूचना देण्यात आल्या आहे. यामध्ये विविध सेवांचा समावेश आहे.सेवा हक्क दिनानिमित्त सेवा हक्काबाबत जनजागृतीसाठी राज्यसेवा हक्क आयुक्त अमरावती, जिल्हाधिकारी यवतमाळ आणि अकोला यांची मुलाखत दि. २८ एप्रिल रोजी अमरावती, यवतमाळ आणि अकोला आकाशवाणी केंद्रावरून सकाळी दहा वाजता प्रसारित होणार आहे. मुलाखतीमध्ये कायद्यातील तरतुदी आणि अंमलबजावणीची माहिती देण्यात येणार आहे.तसेच सेवा पंधरवड्यामध्ये नागरिकांनी प्रलंबित असलेल्या त्यांच्या सेवा प्राप्त करून घ्याव्यात, असे आवाहन अमरावती राज्यसेवा हक्क आयुक्त कार्यालय यांनी केले आहे.

# साहेब वीज दुरुस्ती कामे केव्हा? पावसात होते लगबग

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७अमरावती

एप्रिल महिन्यापासूनच तापमान उच्चांक गाठत आहे. पुढील काळात अवकाळी पाऊस आणि त्यानंतर लगेचच मान्सूनमध्ये वीजपुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी महावितरणकडून वीज दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहे. नागपूर व वर्धा जिल्ह्यात ही कामे सुरू झालेली आहे. मात्र, अमरावती जिल्ह्यात अद्यापही ही कामे सुरू झालेली नाहीत. पावसाळ्याच्या तोंडावर घाईगडबडीने ही कामे थातूरमातूर केली जातात. एप्रिल–मे महिन्यात जिल्ह्यात असा उष्णता असते. त्यातच अचानक येणाऱ्या वादळी वाऱ्यांमुळे आणि विजांच्या कडकडाटामुळे वीज वितरण यंत्रणेवर परिणाम होण्याची शक्यता असते. महावितरणची बहुतेक विद्युत यंत्रणा खुल्या वातावरणात असल्यामुळे, हवामानातील बदलांचा थेट परिणाम तिच्यावर होतो. यामुळे ग्राहकांना वीजपुरवठ्यात अडचणी येतात आणि ग्राहक सेवा विस्कळीत होते. या सर्व गोष्टींचा विचार करून, उन्हाळा आणि त्यानंतरचा पावसाळा वीज ग्राहकांसाठी सुखकर व्हावा, यासाठी महावितरणकडून पूर्वीच उपाययोजना करणे आवश्यक आहे. पावसाळ्यात झाडांच्या फांद्या विद्युत तारांवर घासतात आणि यामुळे शॉर्ट सर्किटसारख्या घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे झाडांच्या फांद्या लवकर तोडणे, वीज दुरूस्ती करणे गरजेचे आहे.



### वीजतारांना ताण दिला का?

वीजतारांमध्ये अडकलेले पतंग, मांजा, पताका, तोरण, फ्लेक्स बोर्ड आणि प्लॅस्टिकचे झेंडे यामुळेही वीजपुरवठा खंडित होण्याची शक्यता असते. त्यामुळे वीजवाहिन्यांमध्ये अडकलेल्या अशा वस्तू तत्काळ काढणे गरजेचे आहे. तसेच सैल झालेले गार्डिंग आणि स्पॅन घट्ट करणे, दोन खांबांमधील लोंबकळत्या तारांना ताण देणे आणि सर्व खांब व त्यांचे ताण सुस्थितीत ठेवणे गरजेचे आहे.

# देशातील पहिले ‘रोड सेफ्टी व्हिजन’ वाहन अकोल्यात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७अकोला

अत्याधुनिक वाहनाद्वारे अपघातावर नियंत्रण मिळवता येऊ शकते. ‘रोड सेफ्टी व्हिजन’ हे अत्याधुनिक वाहन अकोला प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून तयार करून घेण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत बचाव कार्यसह लोकशिक्षणासाठी हे वाहन फायदेशीर ठरेल. या वाहनात विविध सुविधा असून ‘आरटीओ’च्या सेवा देखील उपलब्ध होतील. या प्रकारचे देशातील हे पहिलेच वाहन असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार यांनी दिली.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून ‘रोड सेफ्टी व्हिजन’ हे अत्याधुनिक सुविधा असलेले वाहन जिल्ह्याच्या सेवेत रूजू झाले. त्याला हिरवी झेंडी जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी दाखवली. यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार, उपवनसंरक्षक कुमार स्वामी, सार्वजनिक बांधकाम अभियंता प्रसाद



पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन दराडे, अनिरूद्ध देवधर, संदीप तायडे, संदीप तुरकणे, किरण लोणे, मनोज शेळके आदी उपस्थित होते. जिल्हा रस्ते सुरक्षा समितीच्या प्रस्तावानुसार जिल्हा नियोजन समितीने या वाहनासाठी ३३ लाखाचा निधी उपलब्ध करून दिला. त्यातून हे वाहन निर्माण झाले.

जिल्ह्यात अपघातप्रवण स्थळांची संख्या शून्यावर आणणे आवश्यक आहे. सुरक्षित वाहतुकीसाठी विविध उपाययोजना अंमलात आणतानाच प्रभावी लोकशिक्षण दिले पाहिजे. ‘रोड सेफ्टी व्हिजन’ वाहनाच्या माध्यमातून हे कार्य करता येणार आहे. अपघात घडूच नयेत यासाठी शिस्त निर्माण करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. ‘रोड सेफ्टी व्हिजन’ वाहनात ‘सर्व्हेलन्स कॅमेरा’, ‘सर्चलाईट’ सुविधा आहेत. या वाहनाने साडेसात टनपर्यंत वजन असलेले वाहन ओढून नेता येते. एखादी व्यक्ती वाहनात अडकली असेल तर त्याला बाहेर काढण्यासाठी लागणारे ‘कटर’सुद्धा या वाहनात आहे. महामार्गावर असलेल्या गावांतून, ग्रामीण भागातूनही बैलगाडी, ट्रॅक्टर, दूधविक्रीसाठी येणारे विक्रेते यांच्याकडून वाहतुकीच्या नियमाचा भंग होतो. अनेकदा चुकीच्या दिशेने येणाऱ्या वाहनांचे अपघात होतात. ते टाळता येणे शक्य आहे.

# उपग्रहाच्या मदतीने आता पिकांच्या नुकसान भरपाईचे मूल्यांकन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७अमरावती

राज्यात १ जानेवारी २०२५ पासून दुष्काळ वगळता, इतर नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतीपिके नुकसानीकरिता मदत देण्यासाठी ‘सामान्यकृत फरक वनस्पती निर्देशांक’ (एनडीव्हीआय) हा निकष लागू करण्याबाबत आणि कृषी विभागाद्वारे ‘एनडीव्हीआय’ चे निकष तपासण्यासाठी अद्ययावत प्रणाली उभी करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत.



नैसर्गिक आपत्ती सर्वेक्षणाच्या दृष्टीने मध्यप्रदेश राज्यात आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कार्यपद्धती अवलंबिण्यात येत आहे. त्याचा अभ्यास करण्यासाठी समिती गठित करण्यात आली होती. या अभ्यासगटाने त्यांच्या अहवालात खरीप २०२५-२६ कालावधीमध्ये दुष्काळ वगळता उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीसंदर्भात ‘एनडीव्हीआय’ व इतर (एनडीडब्ल्यू आय, व्हीसीआय, इव्ही, एसएव्हीआय) निकष लागू करण्यासाठी मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र व खानदेश या भौगोलिक विभागातील प्रत्येकी एका जिल्ह्यात पथदर्शी प्रकल्प राबविण्याबाबत शिफारस केली होती. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने, सन २०२५-२६ मध्ये उपग्रह प्रतिमा वापरून पिकांच्या नुकसानीचे मुल्यांकन करण्यासाठी सामान्यकृत फरक वनस्पती निर्देशांकाचा वापर करण्यासंदर्भात परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कृषी हवामान शास्त्रज्ञ, अखिल भारतीय समन्वयीत कृषी हवामानशास्त्र संशोधन प्रकल्प यांचा प्रस्ताव कृषी आयुक्तालयाकडून प्राप्त झाला होता. या प्रस्तावानुसार प्रकल्पासाठी एकूण अंदाजित खर्च १ कोटी रुपये येणार आहे. ई-गर्व्हनन्स कार्यक्रमासंदर्भात आयोजित प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीमध्ये त्यास मान्यता देण्यात आली.